मासिकांक १०

दिनांक: १५ जानेवारी २०२२

# “ती”चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी



संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अंतरंग

टीप: लेखाच्या नावावर क्लिक/टॅप करून आपण आपल्याला हव्या असलेल्या लेखावर जाऊ शकता

(Works best with Adobe Acrobat Reader)


३ प्रस्तावना
सायली देशपांडे

४ दोन शब्द
अभिषेक काणे

५ नवीन हे वर्ष सुखाचे जावो...!
भार्गवी बाबरेकर

७ पारडं
रेणुका देशपांडे - कुकडे

११ शेतकरी आंदोलन आणि कृषी कायदा
निर्मिती देवलसी

१३ गेले द्यायचे राहून
मृण्मयी सारंग

१५ कर्तव्य
अपूर्वा भालेराव

१६ सौ. अदिती सार्थक पुराणिक
प्राजक्ता बर्वे

१९ बहार
संजीवनी मराठे

२० ऋणानुबंधाच्या गाठी
स्वर्णिमा प्रकाश

२३ समारोप
सायली देशपांडे



"ती" चं पान
१७ जानेवारी २०२२

# प्रस्तावना

सर्वप्रथम "ती" चं पान च्या सगळ्या रसिक वाचकांना नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा..! नवीन वर्ष म्हंटलं की, मनात नवीन इच्छा नवीन स्वप्न असतात. वर्ष संपलं की चाहूल लागते ती नवीन वर्षात होऊ घातलेल्या नवनवीन संकल्पनांना अनुसरून काम करण्याची. या नियमाला आमचं मासिक कसं अपवाद असेल नाही का?

"ती" चं पान या आमच्या उपक्रमाचा हा १० वा अंक. जितके अंक तितक्या वेगवेगळ्या संकल्पना हे आमच्या अंकाचं वैशिष्ट्य. प्रत्येक मासिकांकात वेगवेगळे विषय आणि वेगवेगळे लेखन प्रकार..! आणि आनंद या गोष्टीचा वाटतो की यात लिहिणाऱ्या प्रत्येक लेखिकेने हे सगळे वेगवेगळे लेखनप्रकार लिहिले आणि आजपर्यंत आनंदाने या लेखन प्रवासात मला साथ दिली. सादाला पडसाद मिळणं सुद्धा महत्वाचं असतं आणि हा पडसाद मला मिळाला याचा आनंद मी शब्दात व्यक्त करू शकत नाही.

या अंकात दोन शब्द लिहून देणाऱ्या अभिषेक काणे या एका हरहुन्नरी आणि सतत सर्जनशील असलेल्या माझ्या लेखक आणि कवि मित्राचे मनःपूर्वक धन्यवाद. आणि त्यानी म्हंटल्याप्रमाणे "लिहिणाऱ्याने लिहीत जावे" हे आमच्या पुढच्या लेखनाला नक्कीच उपयुक्त असेल हा विश्वास वाटतो.

जानेवारी महिना म्हंटला की, वर्षातला पहिला सण आपल्या भेटीला येतो तो म्हणजे मकरसंक्रांत..! सूर्याचा उत्तरायणात प्रवेश..! तिळगुळाचा गोडवा मनात स्नेह निर्माण करतो तसाच गोडवा आपल्या नात्यात आणि या अंकाच्या वृद्धीत असावा या आशेसह माझ्या लेखणीला विराम देते..! मकरसंक्रांतीच्या मनःपूर्वक शुभेच्छा..!

**- सायली देशपांडे**

# दोन शब्द

## लिहिणाऱ्याने लिहीत जावे

सर्वप्रथम 'तीचं पान' ला शुभेच्छा. उत्तम असा उपक्रम आणि हा उपक्रम करणाऱ्या उपद्रवी अश्या सौ. सायली देशपांडे ला उदंड शुभेच्छा. कुठल्याही प्रकाशकांची बांधिलकी नसलेला, एक मुक्त उपक्रम असल्याने हा अधिक वाचनीय होतो. आजकाल साहित्यिक म्हंटलं की त्याला राजकीय जोड हवीच, ह्यापासून ही तिचं पान अलिप्त आहे. त्याकरिता तर विशेष शुभेच्छा.

आता मूळ मुद्द्याला वळतो. तिचं प्रत्येक पान वाचताना तुमच्याच लक्षात येईल की हा मुद्दा खरं तर मी मांडायची गरज नाही. तरीही.

एका प्रात:स्मारणी साहित्यिकांनी आपल्या जीवनपटाची सुरवात करताना लिहिलं "लिहू का?".

त्यांना पडलेला प्रश्न आपण विदर्भातील असल्याने दोन अर्थानं घेऊ शकतो. Shall I write? आणि what to write?

पण पहिला प्रश्न तसा सोपा आहे. What to write? that is 'the question'

काळानुसार ललित साहित्य सतत बदलत गेलं आहे. आजकालच्या सतत "अपडेट्स" येणाऱ्या जगात ते अजिबात मागे नाही. नवीन साहित्यकृतीही त्याला अपवाद नाहीतच. स्वानुभव कथन हा सध्याचा ट्रेंड म्हणावा लागेल. कधी प्रथम पुरुषातून हा अनुभव व्यक्त होतो कधी तृतीय तर फार क्वचित द्वितीय. ते नेमकं कसं असावं असा काही नियम नाही. मुळात कुठल्याही कलाकृती चे नियम हे मोडीत काढता यायला हवे म्हणूनच समजून घ्यायला हवे. पण ललितात पावर च एवढी आहे की ते कश्यालाही बांधील नाही.फक्त एक भान सतत ठेवावं ते म्हणजे कथानकाची पकड कुठेही ढिली होऊ द्यायची नाही, आधीच्या ओळींमध्ये पुढल्या ओळींच कुतूहल निर्माण करता यायला हवं. परिचय, कथानक आणि परिणाम हा मूळ क्रम असला तरी त्याला परिमाण म्हणून घ्यायलाच हवं असं काही नाही.

कविता क्षेत्र प्रत्येकाला जमतंच असं नाही. पण आपल्या लेखनात दोन चार स्वरचित ओळी काव्याच्या आल्याच तट लेखनाची बहार वाढते. म्हणजे भरल्या पानात तुम्हाला झणझणीत चटणी हवी की एखादी जिलेबी हे काम त्या लेखात कविता करत असते, परत कटू आवडतं की मधुर हा ज्याच्या त्याच्या "तब्बेती"चा प्रश्न आहे. अजून काय सांगणार कसे लिहावे?

आपलं लेखन सगळ्यांनाच आवडेल हे अशक्य आहे. फक्त मासेस साठी लिहिताना फक्त क्लासेस डोक्यात असावे आणि त्यासाठी लिहावं.

लिहिणाऱ्याने लिहीत जावे,
बोलणाऱ्याचे शब्द व्हावे
आपले शब्द कधी कोणाच्या
बोलण्यातील संदर्भ व्हावे

लिहिणाऱ्याने लिहीत जावे
कधी प्रेरणा कधी बोध व्हावे
प्रश्नांत बुडालेल्या कुणाचे
अचंबित करणारे शोध व्हावे

लिहिणाऱ्याने लिहीत जावे,
वाचणाऱ्याने वाचीत जावे
हवंहवंसं "ती"चं पान होऊन
वाचणाऱ्याच्या वहीत जावे

**- अभिषेक रघुवीर काणे**
**नागपुर**

# नवीन हे वर्ष सुखाचे जावो...!

नवीन वर्ष! एक विलक्षण उत्साह , स्फूर्ती , प्रेरणा आणि आनंद घेवून येतं! काहीही नवं म्हटलं की त्या नव्याची उत्सुकता सतत मनात पिंगा घालत असते... मग हे तर चक्क नवीन वर्षच ! एक वर्ष उलटून दुसरं वर्ष सुरू होणं ही किती आनंदाची गोष्ट असते ना!! नवीन वर्ष , त्या वर्षातला पहिला वहिला महिना...नवे संकल्प , नव्या आशा , नवी उमेद. सगळं कसं छान - छान असतं!

एक वेगळीच सकारात्मकता या नव्या वर्षात जाणवते. सरलेल्या वर्षात घडलेल्या वाईट घटना मागे सारून नव्याने यशपूर्तीकडे झेप घेण्याची स्फूर्ती हे नवं वर्ष देतं. या नव्या वर्षात काय - काय करायचं ? मागच्या वर्षी घडलेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेणं..आर्थिक नियोजन करणं..मग कुटुंबातला कोणी एक अर्थमंत्री मधेच मुद्दा ठेवतो आणि " मागच्या वर्षी आपण हा खर्च उगाच केलाय बरं का! या वर्षी असं चालणार नाही अजिबात..." असं ठणकावून सांगतो! मग घरातली कर्ती स्त्री , "या वर्षी तरी जिभेचे चोचले कमी करा! आम्हा बायकांनही जीव असतो म्हटलं! " असं काहीश्या कडक आवाजातच म्हणते.

हे असं सगळं चालू असताना , " आमच्या पिंकीचं यंदाच्या वर्षात तरी लग्न जुळू दे रे बाबा " असा एक सूर कानावर पडतो आणि पुन्हा पिंकीसाठी स्थळ बघायला तिच्या घरची मंडळी कंबर कसून तयार होतात ! किती छान छोट्या - छोट्या गोष्टी असतात ना , ज्या वर्षभर आपल्या स्मरणात राहतात....! मग वर्ष सरताना आपण वर्षभरातल्या खास क्षणांची उजळणी करतो तेव्हा हेच क्षण आपल्या चेहेऱ्यावर हसू उमटवतात..

आयुष्याचं असंच असतं! कुठलीही एक परिस्थिती कायम नसते. दिवस बदलतात आणि आपणही त्या प्रमाणे स्वतः ला परिस्थितीशी जुळवून घेण्यात यशस्वी ठरतो...! अश्या वेळी शांताबाई शेळके यांच्या काही ओळी आठवतात. त्या म्हणतात -

कुठले पुस्तक , कुठला लेखक
लिपी कोणती , कसले भाकित
हात एक अदृश्य उलटतो ,
पानामागुन पाने अविरत ॥
" झाले गेले विसरून जावे , पुढे - पुढे चालावे..
जीवनगाणे गात राहावे!"

गेलेल्या वर्षात काय करू शकलो नाही ते आठवून नव्या वर्षात ते करण्याचा निर्धार करावा. नवनवीन पुस्तकं, नवे साहित्य , नवीन गाणी , किस्से आणि खूप काही, नव्या वर्षात आणि सोबतच आपल्या आयुष्यात समरस करण्याचा प्रयत्न केला तर येणारं वर्ष अधिकच सुंदर आणि आठवणींनी भारलेलं असेल हे नक्कीच! या सगळ्या गोष्टींसह चेहेऱ्यावरचं गोड हसू मात्र मागे पडू न देणं हे मुख्य!
सरते शेवटी शांताबाईंच्या या ओळी मात्र प्रकर्षाने आठवतात -

"स्वतः स्वतःला देत दिलासा
पुसते डोळे हसता - हसता
उभी इथे मी पसरून बाहू
नवीन वर्षा तुझ्या स्वागता !!"

**- भार्गवी बाबरेकर**

# पारडं

"काय भीमा, लग्न करून आलास वाटतं?"
समोरच्या दोरीवर वाळणारी साडी बघून मी विचारलं.
"हाव जी सायब," तो जरासा लाजत उत्तरला.
"छान छान! घरी घेऊन ये कधी बायकोला चहाला.. तिची वहिनिशी ओळख होईल. नव्या संसारात काही अडलं नडलं, तर वहिनीची मदत होईल तिला."
"नक्की येईन सायब".
भीमाचा निरोप घेऊन मी गाडी ऑफिसकडे दामटली.

आमच्या घरापुढे नामांकित बिल्डरची एक उंच इमारत होऊ घातली होती. भीमा हा तिथला चौकीदार. बिल्डिंगचं काम नुकतं सुरू झालं, तेव्हा तो सगळ्या मजुरांसाठी पाणी मागायला म्हणून घरी आला. पाण्यासाठीच पुन्हा त्याच्या दोन तीनदा खेपा झाल्या, तेव्हा मी ओळख करून घेतली... २४-२५ वर्षांचा उत्साही तरुण.. पोरसवदाच पण अतिशय प्रामाणिक, कामसू मुलगा.. बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या हद्दीत लहानशी तात्पुरती झोपडी त्याच्यासाठी बांधलेली होती. ४ दिवस गावी जाऊन आला तर लग्न करून बायकोला घेऊन आला..कुसुम तिचं नावं. तीही त्याच्यासारखी पोरसवदा... २०—२२ ची असेल नसेल.. काळी सावळी, लाजरी बुजरी... बायकोची कुसुमशी चांगली ओळख झाली.

वहिनी वहिनी म्हणत कुसुम बरेचदा घरी येत असे. कधी भाजी बाजार, धुण भांडी या कामात बायकोला तिची मदत होई. कधी जुने कपडे, घरात शिजलेले गोड धोड यांची पाठवणी आमच्याकडुन भीमा घरी होई. दोन्ही मुलांनी आम्हा सर्व कुटुंबीयांचा विश्वास सहज जिंकून घेतला होता.

भीमा आणि कुसुम ला बघून मला उगाचच कधी कधी रुख रुख वाटे. इतकी कष्टाळू, प्रामाणिक ही पोरं. पण इयत्ता चौथी पुढे शिक्षण नाही, शहरातल्या जीवनाचा अनुभव नाही. ' कमावते आहेत, स्वतःच्या पायावर उभे आहेत , पण हे मजुराचं जीण हे कसलं जीण म्हणायचं. आयुष्याची उमेदीची वर्ष ही, जरा शिक्षण गाठीशी असतं तर खरोखर प्रगती केली असती त्यांनी, मानानी जगले असते', मी स्वतःच्याच मनाशी चुकचुकत असे. भीमा आणि कुसुम ला मात्र शाळा सोडल्याची खंत असल्याचं कधी जाणवलं नाही. परिस्थितीनी भाग पाडलं तसं हातावरचं पोट स्वीकारलं होतं त्यांनी. त्यांच्याबद्दल असणाऱ्या आपुलकी मुळे मलाच कधी तरी ही हळहळ वाटे, एवढंच.

दिवसामागून दिवस उलटत होते. जीवनाचं रहाटगाडं नेहमीप्रमाणे चाललं होतं. त्या एका शुक्रवारी हवामान खात्याचा इशारा आला - " पुढचे 48 तास वादळी पावसाची शक्यता." असे कित्येक इशारे येतात अन् जातात. "हवामान खात्याने सांगितलंय ना? मग आता पुढचे 2 दिवस लख्ख ऊन पडणार बघा!", बायको गमतीत म्हणाली सुद्धा. खरेच, आता जानेवारी मध्ये पाऊस म्हणजे काय बोलावं? आजकाल वातावरणाचा काही भरोसा राहिलेला नाही हो. बातमीचं आम्ही फारसं मनावर घेतलं नाही. घरी मुक्कामी पाहुणे येऊ घातले होते त्या तयारीला लागलो.

शनिवार उजाडला, पाहुणे आले आणि त्यांच्या पाठोपाठ पाऊस सुद्धा! सुरुवातीला रिमझीमता गारवा बरा वाटतं होता खरा, पण दिवस ओसरू लागला, तसतसा त्याचा जोर वाढू लागला. काही वेळापूर्वी बरसणाऱ्या हलक्या सरी आता ढग फुटी सारख्या थैमान घालू लागल्या. बायकोला अचानक कुसुमची आठवण झाली.

"असल्या वादळात कसा निभाव लागणार हो पोरांचा, त्यांना घरी बोलवून घ्यायला हवं," ती काळजीने म्हणाली.

"हो खरंय, मी त्यांना बोलवून आणतो".

बोलवून आणतो मी म्हणालो खरा, पण पाहुण्यांच्या सरबराईत असा घरात पाय अडकला की,  जाणं जरा लांबलंच. मी जातो, जातो म्हणतोय तेव्हढ्यात ती किंचाळी ऐकली आणि काळजात धस्स झालं. सगळे तसेच धावत बाहेर गेलो.

झोपडीच्या छप्पराने पावसापुढे कधीच हार मानली होती. तिथे थांबणं अशक्य झालं, तेव्हा भीमा आणि कुसुमने आडोसा म्हणून अर्धवट बांधकाम झालेल्या इमारतीचा आधार घेतला. धारांच्या या तांडवात ती कच्ची भिंत टिकू शकली नाही. पत्त्यांचा बंगला कोसळावा, तशी ती भिंत ढासळली. आणि ढासळली ती थेट भीमा आणि कुसुमच्या अंगावर!

आम्ही धावत तिथे पोहोचलो, बाकी शेजारी देखील आले. लगद्यातून कशी बशी दोघांची सुटका केली. दोघंही बरेच जखमी होते, पण भीमाची अवस्था गंभीर आहे हे ओळखायला डॉक्टरी पदवीची गरज नव्हती. त्वरित दोघांना गाडीत बसवून दवाखान्याकडे निघालो. मी म्हणणारा पाऊस, निसरडे रस्ते, बेपत्ता डॉक्टर, दवाखान्यातला थंड कारभार साऱ्या साऱ्या अडचणींतून मार्ग काढत शक्य तितक्या लवकर दोघांवर उपचार सुरू केले. फारसा उपयोग मात्र झाला नाही. भीमाला वाचवू शकलो नाही, असं डॉक्टर म्हणाले, तेव्हा मी सुन्न झालो.

झाल्या सर्व प्रकारासाठी माझं मन स्वतःला दोषी मानू लागलं. मी वेळेत त्यांना बोलवून घरी आणलं नाही, हा विचाराने माझा छळ सुरू केला. तरण्याताठ्या भीमाचा

हसरा चेहरा सतत डोळ्यापुढे येऊ लागला. बाहेर पावसाचं थैमान आणि मनात अक्षम्य अपराधाचं! सैरभैर झालो. कुसुमची परिस्थिती धोक्याबाहेर होती, पण आता ही बातमी ऐकून तिची काय अवस्था होणार, याची कल्पना देखील मला करवत नव्हती.

आणि घडलं सुद्धा तसंच! भीमा दगवल्याचं ऐकल्यावर कुसुमच्या दुःखाला पारावार उरला नाही. तिच्या डोळ्यातलं पाणी खळेना. बायको सतत तिच्या बरोबर होती खरी, पण कुणाच्या सोबतीने, सांत्वनाने हलकं व्हावं, असं हे दुःख नव्हतंच. आणि सांत्वन करण्यासाठी सुद्धा दुःखावर हलकीशी खपली धरलेली असावी लागते, भळभळणाऱ्या दुःखाचं सांत्वन करता येत नाही. तिची समजूत काढायला आमच्यापाशी शब्द नव्हते. भीमाच्या घरी गावी निरोप कळवला, तो कामाला होता त्या बिल्डरला निरोप दिला. इथे शहरात त्याचं कुणीच नसल्यामुळे आता आम्हीच पुढची जुळवा जुळव करणार, तेवढ्यात बायकोनी मला थांबवलं. तिने मला कुसुमचा जो निग्रह सांगितला, ते शब्द ऐकून मी थक्क झालो. **Organ donation!**

Organ आणि donation या दोन्ही इंग्रजी शब्दांचा अर्थ तिला कळत नसणार, हे मला नक्की ठावूक होतं.. पण तिला कळत होता त्या मागचा विचार.. आणि त्या विचारावर ती ठाम होती. ही खेडवळ, लाजरी बुजरी मुलगी असा धाडसी, प्रगल्भ विचार करू शकते?! मी चाटच पडलो. अर्धशिक्षित म्हणून मी जिला मागासलेली समजत होतो, तिच्या वैचारीक उंचीपुढे आता हजारो सभ्य, सुशिक्षित लोक मला खुजे वाटू लागले, अगदी मी स्वतः सुद्धा!

लहानपणी हार्ट transplant ने भावाचे प्राण वाचल्याचे तिनी बघितले होते. कुण्या अज्ञाताच्या ऋणाची परतफेड करण्याचा हा तिचा प्रयत्न होता. स्वतःवर असा अनपेक्षितपणे दुःखाचा डोंगर कोसळला असताना, भान सावरून हा परोपकारी विचार करणं, सोपं का असेल या पोरीसाठी? पण केवळ विचार करून न थांबता ती त्यावर ठाम होती, तो तडीस नेण्याची तिच्या मनाची तयारी होती, यात तिचा मोठेपणा! जमेल तसा तिने तिचा निर्णय डॉक्टरांना सांगितला. कुटुंबीयांची समजूत काढली. डॉक्टरांनी वेगाने चक्रे फिरवली. योग्य वेळेत अवयव दान करण्यात आले.

भीमा आणि कुसुमने आमचं प्रेम आणि विश्वास तर आधीच जिंकला होता, पण आज ही मुलगी आमच्या आदरास पात्र ठरली. तिच्या एका निर्णयाने कित्येक गरजवंतांच्या आयुष्याचा दर्जा सुधारला. कुणाला दृष्टी मिळाली, कुणाला जीवदान. माझ्या पदव्यांच्या पारड्यापेक्षा तिच्या माणुसकीचं पारडं जड ठरलं होतं.

वादळी 48 तासांचा तो अंत होता. माझ्या अरुंद दृष्टिकोनाचा तो अंत होता. पण भीमाच्या अस्तित्वाचाही तो अंत होता? की नवी सुरुवात?

**- सौ. रेणुका देशपांडे- कुकडे**

# शेतकरी आंदोलन आणि कृषी कायदा

उभ्या जगाचा पोशिंदा, अरे सर्व जगाचा बाप ।
माय बाप सरकारनेच केला, त्याच्या डोक्याला ताप ।
आणला कृषी सुधारणा विधेयक ,२०२०चा रे  वारेमाप ।
असा कसा रे कायदा , त्याच्या गळा  लागला रे फास ।।
जिवनाची  ना राहिली  त्याला रे मुळी आस ।
म्हणून शेतकऱ्याने घेतला आत्महत्येचा  ध्यास ।
नसे पर्याय का तया पुढे, लक्ष्मीचे कुंकू पुसले  रे आज ।
असा कसा रे कायदा ,त्याच्या गळा लागला रे फास ।
त्याच्या कष्टाच्या पिकाला ,विके व्यापारी किंमत वाढवून
सावकार कंपन्या करी साठेबाजी साठवून ।
नफानफा करत करी मोठीगर्दी  सौदेबाजी फिरून
बिचाऱ्या शेतकऱ्याची परिस्थिती आजही मात्र कर्जबाजारी होऊन ।
असा कसा रे कायदा, त्याच्या गळा लागला रे फास ।।
केंद्र सरकारने आणले रे कृषी सुधारणा विधेयक ।
त्यात त्यांच्या भरिस मोठें अध्यादेश।
हिरमुसला बाप दिसते आसपास ,अस्पष्टतेचे धोरण ।
मग बांधले रे आंदोलनाचे तोरण ।
असा कसा रे कायदा, त्याचा लागला रे फास।।
कायदा ५५च्या सुधारणात केली मालाची साठेबाजिच्या सोई ।
थेट उद्योगक्षेत्रात कंपन्या माल विकत घेई ।
यांने तर शेतकऱ्यांची परिस्थिती आणखी बिकट होई।
अशयाने निर्माण होते लोकशाहीत भांडवलशाही ।
असा कसा रे कायदा , त्याचा गळा लागला रे फास।।
दुसऱ्या २०२० ने तर, जणू शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यच हिरावले ।
केला भावाचा करार , पिका अगोदरच हमीभाव ठरवले ।
समूह करारने मालाची किंमत  ठरवण्याचे धैर्यही धजावले।
मजुरी नाही , आभाळ , पाण्याचा विचार नाही ह्यांना कसे नाही हो गवसले?।
असा कसा रे कायदा , त्याच्या गळा लागला रे फास ।

गल्ली ते दिल्ली पर्यंतच्या पॅनकार्ड धारकांना माल करता येईल खरेदी ।
तिसऱ्या कायद्याने ठरविला शेतकऱ्यालाच मोठा फिर्यादी ।
माझ्या सीमेत माल येऊ देणार नाही ,
अशया  शेतकऱ्याची कोरोना काळातही चालू शेतीची फॅक्टरी ।
करूनि , धान्य पिकावूनी आम्हा घेतले रे उरी ।
याच्यासाठी जबाबदार योजना सरकारी ।
म्हणूनच शेतकरी कृषीविषयक कायद्यासाठी आंदोलन करी ।
असा कसा रे कायदा त्याच्या गळा लागला रे फास ।।

**- निर्मिती राजकुमार देवलसी**

# गेले द्यायचे राहून

आयुष्य जगत असतांना काळाच्या ओघात रहाटगाडग्यात आपण असे काही पिसलो जातो की काही गोष्टी राहून जातात. काही स्वतःसाठी जगायच्या आणि काही इतरांसाठी करायच्या. ते क्षण पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे निसटून जातात आणि आपण रितेच राहतो. आपल्या भावना तशाच गोठून राहतात आणि ते देणे द्यायचे राहून गेले याची एक हुरहूर मनाला चटका लावून जाते. असंच काहीस आज सरिता ला जाणवत होतं.

इतके वर्षाचा संसार, मुलांचं संगोपन ह्यातून तिला आज पहिल्यांदाच असा शांत , निवांत असा स्वतःसाठी वेळ मिळाला होता. नवरा समीर कामानिमित्य बाहेर गावी गेला होता आणि मोठा मुलगा शिक्षणासाठी परदेशी तर लहान मुलगा मित्रकडे गेला होता जो दुसऱ्या दिवशी येणार होता. आता घरात निरव शांतता होती.

दिवसभराचे सगळे काम आटपून, नवरा मुलांना फोन वरून त्याची विचारपूर करून सरिताने स्वतःसाठीच छान गरमा गरम आलं घातलेला चहा केला अगदी तिला आवडतो तसा आणि सोफ्यावर येऊन बसती झाली. चहाचा पहिला घोट घेताच तिला जाणवलं की कितीतरी दिवसांनी ती अशी एकटी बसली आहे आणि तेही मनासारखा चहाचा कप हातात घेऊन. चहाचा एक-एक घोट घेत घेत ती कधी जुन्या आठवणीत शिरली तिच तिलाच कळलं नाही.

तिला डान्स खूप आवडायचा. समोरच्याने केलेली स्टेप ती अगदी हुबेहुब करायची तेही न शिकवता एका पाहण्यात. हौस म्हणून तिने स्वतःच पैसे जमा करून घुंगरुही विकत घेतले होते. पण घरची परिस्थिती जरा बेताचीच होती त्यामुळे कुठेही शास्त्रोक्त शिक्षण घेताच आलं नाही. पुढे घरची मोठी म्हणून जरा लवकरच लग्न झालं. डोक्यावर अक्षदा पडल्या आणि नवनवीन जबाबदाऱ्या सुद्धा त्याचा जोडीला पाठीशी आल्या.

पुर्वी नाजूक परिस्थिती आणि घरातली मोठी समजूतदार म्हणून काही गोष्टींसाठी मनाला मुरड घालावी लागायची आणि लग्न झाल्यावर सून, बायको आणि कालांतराने आई म्हणून स्वतःचा विचार बाजूला ठेवून वागावं लागलं. आजवर कायमच दुसऱ्यांच्या विचारांमुळे आपण कितीतरी वेळा स्वतःलाच दुखावलं ह्याची जाणीव आज सरीताला झाली. तिच विचारचक्र सुरूच होत की तिच्या कानावर कुठून तरी गाण्याचे बोल ऐकू आले , "गेले द्यायचे राहुनी तुझे नक्षत्रांचे देणे, माझ्यापास आता कळ्या आणि थोडी ओली पाने" आणि ती भानावर आली.

तिला जाणवून गेलं की हे गाणं किती जवळच आहे तिच्या. जणू तिच्यासाठीचं तिच्या मनातलेचं शब्द कवींनी लिहिले होते. ती तशीच उठून त्या आवाजाच्या दिशेने गेली . बालकनीत पोहोचल्यावर समोरच्या इस्त्रीच्या दुकानातील रेडिओ वर गाणं सुरू असल्याचे तिला कळलं. आणि नजरेस पडला तो मावळता सूर्य. स्वतःसाठी जगायचे राहून गेलेले अनेक क्षण तिला आठवू लागले.

सगळ्यांना हवं ते देतांना स्वतःला द्यायचं मात्र आपण राहून गेल ह्याची जाणीव आणि खंतही तिला वाटू लागली. कपाटात कुठे तरी कोपऱ्यात ठेवलेले घुंगरू तिला खुणावू लागले. त्या मावळतीच्या सूर्याकडे बघत तिला काय वाटले कोणास ठाऊक आणि ती स्वतःशीच पुटपुटली उद्या येणाऱ्या नवीन दिवसापासून आपण स्वतःला द्यायचा राहून गेलेला प्रत्येक क्षण परत करायचा. जे राहून गेलं ते ह्या सूर्या सोबत त्या क्षितीजा पल्याड पाठवून द्यायचं आणि उद्या येणाऱ्या नवीन दिवसा सोबत ते सगळे क्षण स्वतःला परत करायचे.

**- मृण्मयी सारंग**

# कर्तव्य

गरीबाच्या डोक्यावरची कावड मोळी होणं
चांगलं ||

कधी कधी माधुकऱ्याची झोळी होणं
चांगलं |

शत्रुच्या छावणीत दगाबाजी करण्यापेक्षा |
स्वदेशासाठी बंदुकीची गोळी होणं चांगलं |

केव्हातरी आयुष्याची होळी होणं चांगलं |
भुकेलेल्या पोटासाठी पोळी होणं चांगलं |

गरीबाच्या डोक्यावरची कावड मोळी होणं
चांगलं ||

शोभेसाठी भरजरी वस्त्र होण्यापेक्षा |
उघड्या आई बहिणीची चोळी होणं चांगलं |

ज्ञानवाढीसाठी समुद्रात घेतलेली उडी होणं
चांगलं |

कधी तरी आभाळाची शिडी होणं चांगलं |
नारळाच्या झाडाचं श्रीफळ होण्यापेक्षा |
कधीतरी गुलाबाची कळी होणं चांगलं |

गरीबाच्या डोक्यावरची कावड मोळी होणं
चांगलं||

जीवनात साखरेची गोडी होणं चांगलं |
कधीतरी पावसातली होडी होणं चांगलं |

विषमतेची विषारी रूढी होण्यापेक्षा |
घरोघरी समानतेची गोडी होणं चांगलं |

गरीबाच्या डोक्यावरची कावड मोळी होणं
चांगलं ||

**- अपूर्वा भालेराव**

# सौ. अदिती सार्थक पुराणिक

तुम्ही कधी ये जवानी है दिवानी हा picture पाहिलाय? श्शी... मी पण कसला प्रश्न विचारतेय... mostly सगळ्यांनी पाहिला असणार हे गृहित धरून मी पुढचं बोलते...
तर तो चित्रपट पाहिल्यावर सगळ्यांना दीपिका पदुकोण व्हायला आवडतं..... सगळ्यांना असं वाटतं, "की अगर बनी अभी चला गया है तो कोई गल नही... आठ साल बाद तो जरूर आयेगा."... पण प्रत्येक मुलगी नयना नसते आणि ती नयना असली तरी तिच्या साठी बनी आठ वर्षांनी येईलच असं काही नाही.

ती मुलगी कल्की कोचलीन अर्थातच आदिती पण असू शकते.... तिचा अवि नावाच्या मुलावर अर्थात आदित्य रॉय कपूर वर वन साईड प्रेम पण असू शकतं.... तो रिस्पोंड करत नाही म्हणून ती ते प्रेम विसरून तरण नावाच्या मुलाशी  अरेंज मॅरेज करून सुखी सुद्धा राहू शकते.....
कर्मधर्मसंयोगाने बघा मी पण अदितीच

नमस्कार, मी आर्किटेक्ट अदिती.... आज म्हटलं जरा स्वतः बद्दल सगळ्यांना सांगावं.
प्रेम या शब्दाचा वापर आपल्या आयुष्यात खूप लहानपणापासून होतो...... म्हणजे हेच बघा न सहावी सातवीत वाटणाऱ्या एका क्षुल्लक आकर्षणाला मी प्रेम समजून बसले.... काय करणार तेव्हा अवतीभोवती असणाऱ्या मैत्रिणींना पण तसच वाटायचं so that was normal.

साधारण नववी-दहावीत गेल्यावर जाणवू लागलं आणि पटू सुद्धा लागलं की अरेच्या!!! ज्या व्यक्ती बद्दल आपल्याला प्रेम वाटत होतं त्याच्याबद्दल आता काहीच वाटत नाहीये???..... छे!!! म्हणजे crush असणार ते असं मीच स्वतःला समजावलं....
मग नंतर दहावीच्या शेवटी शेवटी एका वेगळ्याच unnoticed  मुलाला बघून पाडगावकर म्हणतात त्याप्रमाणे
"तंद्रीत आपल्या असायचा तो जेव्हा, मज सुचतच नव्हते दुसरे काही तेव्हा....
प्राध्यापक होते करीत प्रवचन काही, मज शब्दही त्यातील परंतु कळला नाही....
मी वेडी होऊन टकमक पाहत होते, मज त्याच्या वाचून काही दिसतच नव्हते...
मी इतुकी भित्री, असे कसे मग घडले?... मज नव्हते ठाऊक अजून नाही कळले..."
अगदी हेच आणि असंच वाटू लागलं......

आयुष्यात माझ्याकडे बोलण्याची हिंमत नव्हती, त्यामुळे "नंबर देशील का?" याशिवाय जास्त मी त्याच्याशी बोलूच शकले नाही...

मग अकरावी ते ग्रॅज्युएशन पर्यंत जरा whatsapp bitsapp वर टच मध्ये राहिलो पण "one sided"..... खूप वाटायचं की हा असा जोडीदार पाहिजे, पण नंतर मीच घाबरायचे... एखाद्या व्यक्तीला न भेटता आपण असं कसं ठरवू शकतो?? आणि मग ultimately क्षण आला भाग्याचा.... आला सौख्याचा...., भेटलो की आम्ही... एकदा नाही अनेकदा... अगदी घरी, बाहेर सगळीकडे. भेटल्यावर लक्षात आलं की this might work पण गाडी तिथेच अडुन राहिली की सांगायचं कसं?? मग मैत्रिणीशी अनेक वेळा बोलणं झालं..... पण छे!!! सगळं निष्फळ.... या सगळ्या भानगडीत एकदा असंच टेरेसवर फिरत असताना मी जरा विचार केला, स्वगत म्हणा ना हवं तर.... तेव्हा जाणवलं की जे मला वाटतंय, ते कदाचित फक्त मलाच वाटतंय.... त्याला वाटतंच नाहीये.

त्याला माझ्याशी बोलायला आवडत नाही असं नाही..... पण कदाचित फक्त एक मैत्रीण म्हणून. म्हणजे ही दोन-तीन वर्ष आपल्याला जो आवडत होता त्याला कदाचित आपण "तसे" आवडतंच नाही हे समजल्यावर खूप वाईट वाटलं राव. मन रडू रडू झालं!!! पण मग मीच ठरवलं..... जे अस्तित्वातच नाही, त्याचे विचार मनात आणून उगाच स्वप्नरंजन करायचं नाही.

खूप त्रास झाला...... खरंच...... प्रचंड कठीण गेलं सगळं विसरणं... पण, "आपल्यात काहीतरी सुंदर घडणार होतं..... घडायचं राहिलं... सुंदर राहिलं..." या वैभव जोशींच्या ओळी आठवल्या आणि खरोखर ही सगळी प्रक्रिया जरा तरी सोपी झाल्यासारखी वाटली आणि त्यात माझं architecture चं काम होतच. मी स्वतःला कामांमध्ये इतकं बिझी करून घेतलं, की त्यानेही मला मदत मिळाली. अशीच माझ्या कामात बिझी असताना "तो" आला.... येऊन हसून बोलायलाच लागला..... I was like.... भाई रुक जा.... ठीक से जानती तक नही हूँ मै तुझे..... पण मग हळूहळू इथेही भेटी बोलणं वाढायला लागलं.
"तो" खूपच वेगळा होता.... म्हणजे माझ्या dream checklist पैकी फक्त एक दोनच बॉक्स वर tick mark जरी असला तरी पण आमचे principles आणि ethics मॅच होत होते.... आणि एक दिवस त्यांनी विचारलंच.... खरंतर नाही म्हणण्यासारखं काही नव्हतं पण हो म्हणण्या सारख्या चार पाच महत्त्वाच्या गोष्टी नक्कीच होत्या..... Also he was the first one to actually ask.....
पण मी त्याला म्हटलं की आधी मला आई-बाबांशी बोलायचंय..... तशी तो म्हणाला, "त्यांना तर माहितीये"..... मी completely shocked!!......"म्हणजे??", माझा लगेच

प्रश्न..... "अगं आपल्या आई-बाबांनीच भेटवलंय आपल्याला", त्याचं निरागस उत्तर..... आली आली, सगळी भानगड माझ्या लक्षात आली.....

बरेचदा असं होतं की आपण एखाद्या व्यक्तीत एवढे अडकतो की झापड बांधल्यासारखं इकडेतिकडे पाहतच नाही.... अरे इधर उधर भी थोडा देख लिया करो यार!... दुनिया बहोत सुंदर है!!...

And now here I am... सौ. अदिती सार्थक पुराणिक.

**- प्राजक्ता बर्वे**

# बहार

पर्ण पर्णांचे हे सुर गाती तराणे नवीन
कोणी म्हणतो ठुमरी त्याचा झंकारतो नाद

बीज नात्यांचे मातीत परी अंकुरते वर
चारी दिशांनी वाढूनी सजवीतो रानं छान

येतो वसंत घेऊन ऋतू बहरण्याचा
फांदी फांदीतून निघे नव्या पिढीला त्या पानांच्या

हळुवार ते पान मग हष्टीस ये सृष्टीच्या
पोपटी रंगावर सोनेरी छटा त्या किरणांच्या

तिन्ही पिढ्यांना घेऊन वाऱ्यासवे ते डोलते
हिरव्या पानासंगे  ते पिवळे पर्णही नाचते

त्या आनंदी कुटुंबातं लहर येई वात्सल्याची
जेव्हा चाहूल लागते ....कळी बहरण्याची...

- सई (संजीवनी मराठे)

# ऋणानुबंधाच्या गाठी

जवळपास ३-४ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.. मी ग्रॅज्युएशनला असतांनाची. जून जुलै च्या आसपास माझं कॉलेज सुरू झालं. पहिलंच वर्ष त्यामुळे सगळंच नविन होतं..सगळ्यांसाठीच!

नवीन परिसर, नविन अभ्यासक्रम, नवीन शिक्षिका, आणि नवीन मैत्रिणीही. या सगळ्या नवीन गोष्टींमध्ये कोणी आपलंसं वाटतयं का हे प्रत्येकचजण शोधत होतं. त्याला मी ही अपवाद नव्हते कारण त्यासगळ्यांमध्ये मी ही होते आपल्यापण "vibes" कोणातरी सोबत "match" होतायत का हे शोधणारी. आणि अशातच माझं एका मुलीकडे लक्ष गेलं. तिला पहिल्यांदा बघितलं तेव्हा थोडं आश्चर्य वाटलं मला.

का ते सांगते - कारण generally ग्रॅज्युएशनला वगैरे असतांना मुली ponytail वगैरे घालतात पण...पण ही मुलगी चक्क दोन वेण्या घालून आली होती कॉलेजला! आणि ते ही गुंफून! ते बघून मला जरा नवलंच वाटलं! But there she was - कथ्थक विशारद “The Prajakta Barve” ! कालांतराने आमची एकमेकींशी ओळख झाली. तशी ती फारच कमी बोलणारी..जेवढ्यास तेवढं उत्तर देणारी (म्हणजे फक्त ओळख नविन असेपर्यंतच!) आणि मी मात्र सगळ्यांशीच मनमोकळेपणाने गप्पा मारणारी. अगदीच विरोधाभास होता आमच्या स्वभावात! त्यामुळे हिच्याशी आपलं पटेल की नाही, मैत्री होईल की नाही याची शंका होती! पण त्या १-२ वर्षांत अशा बऱ्याच चांगल्या-वाईट गोष्टी घडल्या ज्यामुळे आम्हाला एकमेकींना चांगलं ओळखता आलं आणि आमच्या ओळखीचं रूपांतर मैत्रीच्या सुंदर नात्यात करता आलं. पण मी वर नमूद केल्याप्रमाणे काही असेही प्रसंग घडलेत ज्यामुळे आमच्यात मैत्री व्हायच्या आधीच एक अढी निर्माण झाली होती. . पण कसं होतं ना जेव्हा आपण परिस्थिती पुढे हतबल होतो तेव्हा नकळत आशेचा एक किरण आपल्याला दिसू लागतो. आमच्याही बाबतीत अगदी तसंच काहीसं घडलं. First Year च्या सुरुवातीलाच आम्हाला “नागपूर आकाशवाणी” या

नामवंत संस्थेत एकत्र काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे कामानिमित्त का होईना पण आमचं बोलणं व्हायचं. कधी आकाशवाणीच्या कार्यक्रमाविषयी, तर कधी ऑफिस मधल्या इतर गोष्टीविषयी आमची चर्चा व्हायची. आणि अशातच एका क्षणी आम्हा दोघींनाही हे जाणवलं, की नाही आपल्यातले गैरसमज दूर करायला हवेत.

तेव्हा दोघींनी ठरवून ज्याकाही वाईट गोष्टी घडल्या किंवा जे काही गैरसमज आमच्यात झाले होते ते दूर केले. आणि तेव्हापासूनच ठरवलं की काहीही हो, अगदी काहीही, पण मानत एवढीशी जरी शंका आली तरी डायरेक्ट एकमेकींशी बोलायचं. आणि त्यामुळेच आज "मैत्री"चा खूप सुंदर प्रवास एकत्र घडतो आहे. यासगळ्यात आकाशवाणीने आम्हाला दोन गोष्टी प्रामुख्याने दिल्यात.. एक म्हणजे पर्सनल लाइफ आणि प्रोफेशनल लाइफ कसं वेगळं ठेवावं हे वयाच्या १८व्या वर्षीच तिने आम्हाला शिकवलं. आणि दुसरं म्हणजे आमच्यातली हरवलेली मैत्री आम्हाला परत मिळवून दिली.. आणि म्हणूनच आमच्या मैत्रीबद्दल मी आज बोलू शकते आहे, लिहू शकते आहे.

ते म्हणतात ना की वाईटातून नेहेमी चांगलंच घडतं, किंवा जे काही होतं ते चांगल्या साठीच होतं यावर आता माझा विश्वास बसलाय! कारण मला हे आजही जाणवतं की त्यावेळेला आमच्यात ते गैरसमज झाले नसते तर कदाचित आज ती माझी सगळ्यात जवळची मैत्रीण नसती! आणि आता तर आमची मैत्री इतकी घट्ट झाली आहे की आम्हाला इंस्टाग्रामच्या अपडेट्स आणि नवीन फीचर्सपासून ते कंपनीच्या मेसेजेस पर्यंत सगळंच एका दिवशी येतं!

गंमतीचा भाग सोडला तर मला इतकंच म्हणावसं वाटतं की नवीन काहीतरी सुरू करतांना जुनं मागेच सोडून जाणं बरेचदा जमतच असं नाही! पण आम्ही प्रयत्न केला आणि आम्हाला जमलं. एक काळ असा होता की ज्यावेळेला एकमेकींशी बोलून देखील एकमेकींना काय म्हणायचं आहे हे कळत नव्हतं! पण आज नुसतं एकमेकींकडे बघितलं तरी कळतं की तिला काय म्हणायचं आहे.

असं म्हणतात की "मैत्री" असा खेळ आहे जो दोघांनी खेळायचा असतो. एक "बाद" झाला तर दुसऱ्याने "डाव" सांभाळायचा असतो. पण आमच्या मैत्रीच्या मैदानात आम्ही दोघींनीही एकमेकींना बाद होण्यापासून वाचवलं आणि एक नवा डाव सुरू केला एकत्र! आमचं ग्रॅज्युएशन झालं, बघता बघता PG पण होत आलं. ती पुढच्या शिक्षणासाठी मुंबईत आणि मी नागपुरात!

पण या भौगोलिक अंतरामुळेच आमच्या मनांचं अंतर कमी झालं असं म्हणतात येईल.

खरं तर आता खऱ्या अर्थाने आम्हा दोघींना एकमेकींची खरी किंमत कळते आहे !

शेवटी मी इतकंच म्हणीन,  "बर्वे  we were destined to meet!"

खूप प्रेम!

**- स्वर्णिमा प्रकाश**

# समारोप


“ती” चं पान. जे फक्त तिचं असेल तिच्या हक्काचं असेल. तिच्या भावनेला शब्दबद्ध करण्याचं एक माध्यम. या माझ्या संकल्पनेला सगळ्यांनी आनंदाने होकार दिला आणि कुठल्याही चांगल्या हेतूने सुरुवात केलेलं कार्य हे सिद्धीस जातं याचं प्रमाण म्हणजे हे आगळंवेगळं मासिक असंच मी म्हणील..यात ज्यांनी ज्यांनी लेख लिहिले कविता लिहिल्या या सगळ्या सख्यांचं वाचन आणि लेखन संस्कृतीवर असलेलं प्रेम असंच राहावं अशी इच्छा व्यक्त करते. आपण हा छोटासा प्रयत्न गोड मानुन घ्याल या अपेक्षेसह माझ्या लेखणीला विराम देते.


धन्यवाद ...!


आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण  नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

**आमचे आधीचे प्रकाशित अंक (अंक वाचण्यासाठी मुखपृष्ठावर क्लिक/टॅप करा):**


















मकर संक्रांतीच्या
हार्दिक शुभेच्छा